
Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV / V

IMPACT FACTOR /
INDEXING 2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

DR. M. K. UMATHE COLLEGE
NAGPUR

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I January - March - 2019

Marathi Part - IV / V

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

DR. M.K. UMATHE COLLEGE NAGPUR

# CONTENTS OF MARATHI PART - V


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिक मंदी भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम व उपाय<br>**प्रा. डॉ. अलका अनिल मानकर** | १-५ |
| २ | ना. गो. थुटे यांच्या कवितेतील प्रयोगशीलता<br>**डॉ. रवि केवट**<br>**पुंडलिक ज. शेंडे** | ६-९ |
| ३ | ग्रामीण कथा - शतका अखेरची - एक चिकित्सा<br>**डॉ. निशा शेंडे** | १०-१३ |
| ४ | भारत व भारतातील अन्नसुरक्षिततेचा अर्थवेवस्थेवरील परिणाम<br>**Priyanka Hanmant Gaddapwar** | १४-१७ |
| ५ | जागतिकिकरणाचा आदिवासी समाजावर झालेला परिणाम<br>**प्रा. डॉ. राजेंद्र एम. झाडे** | १८-२१ |
| ६ | प्रादेशिक विविधता आणि आप्त संबंधाचे महत्व<br>**डॉ. मोहम्मदअली एम. ए.** | २२-२४ |
| ७ | खरातांच्या कथेतील समतामूलक तत्वज्ञान<br>**प्रा. डॉ. अनिलकुमार एस. पगारे** | २५-२९ |
| ८ | भर्तृहरि प्रतिपादित नीतिमूल्यांचे औचित्य<br>**पंकजा माधव वाघमारे** | ३०-३४ |
| ९ | विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या - एक समस्या व त्यावरील उपाययोजना<br>**प्रा. डॉ. विजय के. बन्सोड** | ३५-३९ |




DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR – 6.399 (www.sjifactor.com)**

# ९. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या - एक समस्या व त्यावरील उपाययोजना

**प्रा. डॉ. विजय के. बन्सोड**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर-२२.

**प्रास्ताविक**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा देशाचा, महाराष्ट्राचा पर्यायाने विदर्भाचा नेहमीचाच चिंतेचा व जिव्हाळ्यचा विषय मानला जातो. या ज्वलंत मुद्यावर अनेक समित्या स्थापन झाल्या, सरकारी दरबारी त्यावर बराच काळ विचार मंथन झाले. यावर अनेक योजना, धोरण, उपाययोजना आखल्या गेल्या व त्याची अंमलबजावणी केल्या गेली.

सरकारने अवलंबिलेल्या निती धोरणाच्या अंमलबजावणीचाही अभ्यास केला गेला. परत नविन निती धोरण अवलंबिल्या गेले. सरकार बदलले बऱ्याच अंशी याच मुद्द्यवर नविन सरकारनेही ही समस्या सोडविण्यासाठी परत नविन धोरण आणले. परंतु ही समस्या काही अंशी कमी—जास्त प्रमाणात राहून अजुनपर्यंत ही समस्या समस्याच राहिली व तिने आता अधिकच उग्र रूप धारण केले असून हे संकट अधिकच गडद होत चालले आहे. आजच्या घडीला विदर्भात दर दिवशी सरासरी आठ व वर्षात सरासरी २९०० शेतकरी आत्महत्या करत आहेत. या आकड्यवरूण संपूर्ण सरकारी धोरणाची राजकिय अनास्था याची किव आल्याशिवाय रहत नाही.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या कारणांचा शोध घेणे.
२. शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कृषी व्यवस्थेतील दोष अभ्यासणे.
३. शेतकऱ्यांच्या आत्महत्या व त्यांच्या कर्जबाजारीपणाला कायमचा ब्रेक लागावा यासाठी शासन, शेतकरी व
शेती संबंधीतांसाठी उपाययोजना सुचविणे.

**विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्रात राज्याची निर्मिती झाली. या घटनेला ६० वर्षाचा प्रदीर्घ काळ लोटला आहे. विदर्भ हा महाराष्ट्राच्या भूभागाचा उच्च सांस्कृतिक, आर्थिक व संसाधनाने परिपूर्ण गौरवाने उल्लेख केला जातो. विदर्भात एकूण ११ जिल्ह्यांचा समावेश असून विदर्भाचे एकूण क्षेत्रफळ ९७३२१ चौ.कि.मी. आहे. महाराष्ट्राच्या ३१.०६ टक्के भाग विदर्भाच्या वाट्याला आला असून २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्ये पैकी २३ टक्के लोकसंख्या विदर्भाच्या वाट्याला आली आहे. विदर्भाचे भौगोलिक दृष्ट्या



DR. M.K. UMATHE COLLEGE NAGPUR

पहिला नागपूर विभाग (पूर्व विदर्भ) व दुसरा अमरावती विभाग (पश्चिम विदर्भ, वऱ्हाड) असे दोन भाग पडतात. विदर्भात महाराष्ट्राच्या एकुण संपत्तीतील २/३ खनिज वनसंपदा व ३/३ वनसंपदा लाभलेली आहे.

विदर्भात काळे सोने म्हणजे कोळसा , पांढरे सोने म्हणजे कापूस , हिरवे सोने म्हणजे जंगल व नारंगी म्हणजे संत्री असणारा विभाग म्हणून नावलौकीक आहे. याशिवाय विदर्भात मॅगनीज, लोहा, चूना, टंगस्टन इत्यादी खनिजाचा खजाना मातीत भूगर्भात अस्तीतवात आहे. विदर्भात वैनगंगा, पैनगंगा, पुर्णा, वर्धा, पेंच या सारख्या मोठ्या नद्या वाहत असून विदर्भात कापूस, सोयाबिन, धान, तुर, डाळी, संत्रा अशा ३२ प्रकारची पीके विदर्भाच्या मातीत पीकविल्या जाते. विदर्भात भरपूर पाण्याचे स्त्रोत, भरपूर खनिज असणारा आर्थिक दृष्ट्या समृद्ध व संपन्न असलेला प्रदेश असला तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा या प्रदेशाला लागलेला कलंक आहे. विदर्भातील शेतकरी हा मेहनती असून तो स्वाभीमानी व सधन राहिल्याचे इतिहास सांगतो. विदर्भातील पूर्व विभागातील वर्धा व पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या भागातील लागोपाठ दुष्काळाची परिस्थिती, नापिकी, कर्जबाजारीपना यामुळे येथील शेतकरी दारिद्र्यच्या दृष्टचक्रात सापडलाअसून तो शेवटचा पर्याय म्हणून आत्महत्या करून मृत्यूस कवटाळत आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या खालील आकडेवारी वरूण या समस्येने किती तिव्रता धारण केली आहे कळेल.

| वर्ष | शेतकऱ्यांची आत्महत्या | वर्ष | शेतकऱ्यांची आत्महत्या |
|---|---|---|---|
| २००१ | ५२ | २०१० | ११७७ |
| २००२ | १०४ | २०११ | ९९९ |
| २००३ | १४८ | २०१२ | ९५१ |
| २००४ | ४४८ | २०१३ | ८०५ |
| २००५ | ४४५ | २०१४ | ९६४ |
| २००६ | १४४९ | २०१५ | १३४८ |
| २००७ | १२४७ | २०१६ | १२३५ |
| २००८ | ११४८ | २०१७ | ११७६ |
| २००९ | १००५ | २०१८ | ११६० |

स्त्रोत: संकलीत केलेली आकडेवारी.

**विदर्भातील शेतकऱ्यांच्या समस्या**

१. विदर्भात प्रत्येक वर्षी पडणारा कमी अधिक दुष्काळ.
२. निसर्गाचा लहरीपणा (नैसर्गिक आपत्ती) व अनियमीतपणा.
३. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील सरकारी बँका, सहकारी बँका व सावकारी कर्जाचे वाढते प्रमाण.
४. जमीनीतील घटती उत्पादकता.
५. सिंचनाचे कमी प्रमाण व दुष्काळामुळे मिळणारे सिंचनाचे अनियीमत पाणी.
६. अपुऱ्या पावसामुळे रब्बी हंगामात पीकांची घटती प्रतवारी
७. मानसुनवरचे अधिकचे अवलंबित्व.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

८. कृषी यांत्रीकीकरण व कृषी संयोजन व व्यवस्थापनाचा अभाव.

९. शेतकऱ्यांचे समर्थन मूल्य व उत्पादन मूल्य यातील तफावत.

१०. शेतमालांचे आयात–निर्यात धोरण हे शेतकरी विरोधात राबलीत.

११. तोडके कृषी पतपुरवठ्यचे धोरण.

१२. मुलांचे शिक्षण आरोग्य व प्रचलीत राहणीमानावर वाढलेला खर्च.

१३. मुला–मुलींचे लग्न, मुंज, बारसे इत्यादी सामाजिक चालीरितीच्या कार्यक्रमावर वाढता खर्च.

१४. मजुरांचा अभाव व मजुरी वाढ.

१५. शेतकऱ्यांकडे (अन्नदाता, शेतकरी राजा, दाता, बळीराजा) अशा अजागळ उपमा देऊन त्यांचे आर्थिक शोषण करणे.

१६. शेतकऱ्यांकडे एक उद्योजक किंवा व्यावसायिक म्हणून न बघण्याचा दृष्टिकोन.

१७. शेतकऱ्याला परावलंबी बनवून तो नेहमीच राजकिय व शासकीय मदतीवर व ध्येय धोरणावर अवलंबून ठेवणाऱ्या धोरणांची निर्मीती.

१८. पीक विम्याचे चुकीचे धोरण व सर्व पीकांसाठी पीकविम्याची सोयी नाकारणे.

१९. शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजनात सरकारचे वेळखाऊ व लालफीत शाहीत अडकलेले धोरण, साधन सुविधा यातील भ्रष्टाचार , अपूरी व अयशस्वी राबविलेली कर्ज माफी योजना, सातबारा कधीच कोरा न होने.

२०. आर्थिक आरिष्ट्यांमुळे जोडधंद्याचा अभाव, स्वत: स्वावलंबी न बनु शकण्याची सल व नेहमीच सरकारी योजनांकडे बघत राहण्याचा अपरिहार्य दृष्टिकोन.

अशा अनेक समस्यांचा एकत्रीत परिपाक म्हणजे बळी राजाने आपल्याला दिलेली आपल्या जीवनाची आहूती म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत.

मागील १९ वर्षात विदर्भात १६९८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. मात्र शासनाच्या जाचक निकषांमुळे केवळ ७,६६७ प्रकरणे सरकारी मदतीसाठी पात्र ठरली असून २९६ प्रकरणे चौकशीसाठी अजुनही प्रलंबीत आहेत. म्हणजेच शसन दरबारी केवळ ७,६६७ शेतकऱ्यांनीच आत्महत्या केल्याचे मानले जाते.

२००५ च्या शासन आदेशानुसार आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबात ३० हजार रूपये रोख व ७० हजार रूपयाची मुदती ठेव तहसीलदार व मृताचा वारस यांच्या संयुक्त नावे ठेवली जाते. याशिवाय आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या नावाने असलेल्या सातबारावर कर्जाची नोंद तशीच राहत असल्यामुळे वारसांना त्याच सातबारावर कर्ज मिळत नाही. गेल्या १५ वर्षात यात काहीच बदल केला गेला नाही.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याहेतु मागील पाच वर्षात सरकारने केलेल्या उपाय योजनांचा आढावा**

युती सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना– २०१७ अंतर्गत शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना आणली. या योजने अंतर्गत राज्यातील ८९ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी पात्र ठरविले असून त्यासाठी ३४ हजार कोटी रूपये खर्च करणे अपेक्षित होते. योजनेच्या दोन वर्षानंतर ४३ लाख



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

शेतकऱ्यांच्या बँक खात्यात कर्जमाफी पोटी १८ हजार कोटी रूपये जमा केल्याचा सरकारचा दावा होता. पण प्रत्यक्षात जून २०१९ पर्यंत २५२४ लाख शेतकऱ्यांचे १४६६२ कोटी रूपयांचे कर्ज माफ केले. तसेच १७.१६ लाख शेतकऱ्यांना २७६५ कोटी रूपयांचे प्रोत्साहन अनुदान दिले. याशिवाय ६७७३ कोटी रूपयांची एकरकमी परतफेड अशी एकूण ५०.२७ लाख शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सरकारने २४,१०१ कोटी रूपये मंजूर करून ही रक्कम बँकाकडे वळती केली असल्याने सरकारने जाहीर केले आहे. परंतु, एवढे करूनही कर्जमाफीचा तिढा कायम असलयाचे दिसून येते.

महायुती सरकाने सद्याच्या अर्थसंकल्पात महात्मा जोतीराव फुले कर्जमुक्ती योजना २०१९ नुसार कर्ज माफीची व्याप्ती वाढवीली असुनही कर्जमाफी मार्च व एप्रिल २०२० मध्ये दोन टप्प्यात केला जाणार आहे. सप्टेंबर २०१९ च्या कालावधीपर्यंत दोन लाख रूपये पर्यंतच्या पीक कर्जासाठी आजपर्यंत १३,८८,००० शेतकऱ्यांच्या कर्ज हप्पत्या मध्ये ९०२५ कोटी वर्ग केले असून १५,४५,००० कर्ज खात्याच्या प्रमाणी करणाचे कार्य सुरू आहे. याशिवाय २०१७–१८ ते २०१९–२०२० या तीन वर्षात शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतले व परतफेड केली असल्यास अशा शेतकऱ्यांना ५० हजार रूपये प्रोत्साहनपर दिले जातील तसेच राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्पासाठी १०,३३५ कोटीची तरतूद, शेतीला दिलासा दिला. पुरवण, ५ लाख सौरपंपाची योजना, पीक विमा योजनेतील त्रुटंची दुरूस्ती इत्यादी कार्य अपेक्षित आहे.

**शेतकऱ्यांच्या कर्ज बाजारीपणाचा शासनावर आरोप**

शेतकरी व शेतकऱ्यांची बाजू लावून धरणारे नेते, अभ्यासक यांनी कर्ज बाजारीपणा हे एकप्रकारे सरकारने शेतकऱ्यांवर लादलेले ओझे असल्याचे म्हटले आहे. शासनाने केलेले शेती व शेतकऱ्यांसबंधी विविध नियम, योजना, निती तसेच शेती व शेतमालावर खरेदी–विक्रीवर वेळोवेळी घातलेले निर्बंधच शेतकऱ्यांच्या वाढत्या कर्ज बाजारीपणाला कारणीभूत असून या सर्वाची अंतिम परीणीती म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत.

म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नये, त्यांचे कर्जबाजारीपण वाढु नये, कर्जमाफी व शेतकरी आत्महत्या यावर सत्ता व विपक्ष यात मतांचे राजकारण न करता शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कर्ज बाजारीपणाला कायमचा ब्रेक लागावा यासाठी खालील उपाययोजना शासन, शेतकरी व शेती संबंधीतांसाठी सुचविता येतात.

१. देशातील शेती व शेतकऱ्यांच्या दशा व दिशा सुधारण्या हेतु डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारने व त्या लागू करने.
२. कृषी विधापिठे व कृषी महाविधालये याच्या संख्येत वाढ करून त्यांना स्थनिक शेती विकासाची जववबदारी निश्चित करने.
३. शेत मालास उचीत भाव मिळावा, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ, शेती पलायन इत्यादि समस्या सोडविण्यासाठी कृषी विकास आयोगाचे गठन केले जावे.
४. ग्रमिण क्षेत्रात कृषी आधारीत उधोगांच्या स्थापना व रोजगार निर्मिती करणे.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

५. पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन,मत्सयपालन इत्यादि व्यवसायांना प्रोत्साहन व यातील उत्पादित मालाच्या खरेदी व विक्रीची व्यवस्था करणे.

६. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची सांगळ घालून वैज्ञानीक पध्दतीने शेती करण्यास प्रोत्साहन व प्रशिक्षणची सोय करणे.

७. कृषी मालाच्या विक्रीची पारदर्शक व सक्षम व्यवस्था करावी.

८. सर्व शेतमाल उत्पादनाच्या विम्याची सोय सरकारी कंपनीद्वारे करावी.

९. शेतकरी व शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांच्या उत्थानासाठी मोफत शिक्षण व प्रशिक्षणाची सोय करने.

१०. शेती संबंधीत सर्व सरकारी योजनांच्या फलनिष्पत्तीचा दर पाच वर्षानी पुर्नरआढावा व याजनेची योग्य अमलबजावनी न करणाऱ्यास दंडाची व शीक्षेची तरतुद करावी.

११. कृषी व्यापारासाठी डीजीटल प्लॅटफॉर्म मिळवून देणे.

वरिल सर्व बाबींची पुर्तता देशातील शेती व्यवसायात शक्य झाल्यास शेती व शेतकऱ्यांच्या पुनर्रविकासाकरीता नक्कीच लाभदायक होइल व शेती हा एक सफल व्यवसाय बनू शकेल. अन्यथा शेतकऱ्यांस अन्नदाता, बळीराजा संबोधुन त्याचे कायम शोषन होत राहिल्यास शेतीतुन शेतकऱ्यांचे पलायन व आत्महत्या या नित्याचीच बाब होउन शेती, शेतकरी पर्यायाने देश व आपन सर्व या विनाशाचे कारण ठरून केंद्र सरकारचे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट वाढ करण्याचे लक्ष्य हे एक दिवास्वप्न ठरल्याशिवाय राहनार नाही.

**संदर्भ**

१. प्रतियोगीता दर्पण नोव्हेंबर २०१८

२. डॉ.जी.एन. झामरे, 'भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थपास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

३. Datt R. and Sundharam K.P.M. (2016): *Indian economy*. S. Chand and Company Ltd., New Delhi.

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal


## An International Multidisciplinary Quarterly Research Journal

ISSN 2277 - 5730

Volume - VIII, Issue - I, January - March - 2019

# AJANTA

Impact Factor - 6.399 (www.sjifactor.com)

ISO 9001:2008 QMS ISBN / ISSN


Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. विजय के. बन्सोड

As a Recognition of the Publication of the Paper Titled

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या - एक समस्या व त्यावरील उपाययोजना


**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com


PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Editor : Vinay S. Hatole